# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६
## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजता)

(क) **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा—**

**(मंगळवार, १७ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) —**

**सर्वश्री संजय खोडके,** विक्रम काळे, इद्रिस नायकवडी, वि.प.स. **यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"राज्यातील इतर विभागांच्या तुलनेत अमरावती विभागातील औद्योगिक स्थिती अत्यंत चिंताजनक असून, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटक आणि सूक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांची संख्या संपूर्ण राज्यात या विभागात सर्वात कमी असल्याचे दिसून येणे, हा भाग मुख्य कापूस उत्पादकपट्टा असूनही या विभागात केवळ मोजक्याच मोठ्या उद्योगांची उपस्थिती असणे, उद्योगांच्या अभावामुळे रोजगाराच्या संधीही तुलनेने खूपच कमी असणे, अमरावती येथील 'पीएम मित्र' पार्क हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा वस्त्रोद्योग प्रकल्प असणे, मात्र येथील जमिनीचे भाव अधिक असल्याने गुंतवणूकदारांमध्ये साशंकता असणे, त्यामुळे हे भाव कमी करणे गरजेचे असणे, तसेच 'पीएम मित्र' पार्कसाठी 'Project Management Consultant' (PMC) किंवा तत्सम विशेष तज्ज्ञ यंत्रणा नेमणे गरजेचे असणे, औद्योगिक वसाहतींमधील मोठ्या प्रकल्पांच्या दिरंगाईबाबत बोलायचे झाल्यास, रेमंड कंपनीला प्लांटसाठी ५०० एकर जागा देण्यात आली असून त्यापैकी केवळ ३८ एकरवर काम सुरू असणे तसेच ठरल्याप्रमाणे ३ शिफ्टमध्ये काम अद्याप सुरू न झाल्याने ते तातडीने सुरू करण्याची आवश्यकता असणे, त्याचप्रमाणे, भारत डायनॅमिक्सला ४०० एकर जागा देऊनही तो प्रकल्प अद्याप सुरू झाला नसल्याने स्थानिक विकासाचे उद्दिष्ट साध्य होण्यात अडथळे येत असणे, औद्योगिक पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी मेगा टेक्स्टाईल पार्कप्रमाणेच इतर उद्योगांसाठीही सांडपाणी प्रक्रिया पुनर्वापर प्लँट (STP/ETP) लावणे गरजेचे आहे, ज्याचा थेट फायदा तेथील इतर उद्योगांना होऊ शकणे, अमरावती विभागातून मालवाहतुकीसाठी येणारा मोठा खर्च कमी करण्यासाठी या भागात 'एक्स्पोर्ट कंटेनर डेपो टर्मिनल' उभारणे ही उद्योजकांची जुनी मागणी असणे, या सर्व बाबींचा विचार करता, अमरावती विभागाच्या औद्योगिक पुनरुज्जीवनासाठी आणि बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(ख) **लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६ व मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.किशोर दराडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, फार्मसी, आर्किटेक्चर व इतर उच्च तंत्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाकडून विविध योजनांतर्गत शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परतावा देण्यात येत असणे, मात्र गेल्या काही वर्षांपासून या शिष्यवृत्तीची रक्कम मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिल्याची बाब निदर्शनास येत असणे, अनुसूचित जातीच्या (SC) विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती थेट त्यांच्या बँक खात्यावर जमा होत असणे, संबंधित महाविद्यालयांकडे ती रक्कम जमा होत नसल्यामुळे विद्यार्थी व महाविद्यालय यांच्यात वाद होत असणे, तसेच महाविद्यालयांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असणे, गेल्या सुमारे ९ वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर NT/OBC विद्यार्थी शिष्यवृत्तीची रक्कम शासनाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे महाविद्यालयांचे नियमित खर्च, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन, तसेच शैक्षणिक सुविधा पुरविणे यावर गंभीर परिणाम होत असणे, आर्थिक ताणामुळे काही महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे (Documents) अडवून ठेवण्याचे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी देखील समोर येत असणे, परिणामी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण, नोकरी किंवा प्रवेश प्रक्रियेत अडचणी निर्माण होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (२) ते (६)] —**

(२) **श्री. वसंत खंडेलवाल, डॉ. परिणय फुके, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र हे देशातील एक प्रगत राज्य असून, येथे गेल्या काही दशकांत लोकसंख्येच्या रचनेत मोठया प्रमाणात बदल झाल्याचे दिसून येणे, राज्यातील काही विशिष्ट भागांतील लोकसंख्या वाढीचा दर आणि तेथील स्थलांतरणाचे प्रमाण यामुळे राज्यामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय तसेच सुरक्षा पैलुंच्या अनुषंगाने समस्या निर्माण होऊन, सदर बाबींचा उपलब्ध संसाधनांवर प्रचंड ताण पडत असणे, राज्यामध्ये सध्या विवाह, घटस्फोट, वारसाहक्क आणि दत्तक विधान यांसारख्या वैयक्तिक बाबींसाठी वेगवेगळ्या समुदायांचे वेगवेगळे कायदे अस्तित्वात असणे, या कायदेशीर विविधतेमुळे राज्यामध्ये प्रशासकीय तसेच

न्यायिक बाबींमध्ये गुंतागुंत निर्माण होऊन त्याचा जातीय एकता व सामाजिक सलोखा यावर विपरीत परिणाम होत असणे, भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ४४ मध्ये राज्यात नागरिकांसाठी 'समान नागरी कायदा' सुनिश्चित करण्याची मार्गदर्शक तत्त्वे लागू करणे आवश्यक असणे, अलीकडेच उत्तराखंड सारख्या राज्याने हा समान नागरी कायदा लागू केलेला असणे, त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्याची अंतर्गत सुरक्षा, सांस्कृतिक अखंडता, सामाजिक ऐक्य आणि सर्वांना समान न्याय मिळण्यासाठी, महाराष्ट्र राज्यामध्ये 'समान नागरी कायदा' लागू करण्याबाबत शासनाची भूमिका व त्याबाबतच्या पुढील उपाययोजना."

**(३)** **सर्वश्री एकनाथराव खडसे, शशिकांत शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यातील मौजे हरताळे येथील गट क्र. ७११, ३२२ व २८७ सह हरताळा ते ओझरखेडा धरणादरम्यान गायरान क्षेत्रात स्टोन क्रशर चालकाने संगनमताने कोणत्याही कायदेशीर परवानगीशिवाय हजारो ब्रास मुरुम आणि दगडाचे बेकायदेशीर उत्खनन केलेले असणे, या अवाढव्य उत्खननामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडालेला असणे, सदर अवैध उत्खनन ओझरखेडा धरणाच्या भिंतीपासून अवघ्या २०० मीटर अंतरावर ब्लास्टिंग सुरू असून तीव्र स्फोट धरणाच्या सुरक्षिततेसाठी घातक असणे, या स्फोटांमुळे परिसरातील विहिरींच्या पाणीपातळीत घट होणे, यासंदर्भात स्थानिक महसूल यंत्रणेने स्थळ पाहणी करून दोन महिने उलटले तरी अद्याप कोणतीही ठोस फौजदारी कारवाई केलेली नसणे, या प्रकरणाची तांत्रिक व सखोल चौकशी SIT मार्फत करून उत्खनन क्षेत्राची ETS द्वारे अचूक मोजणी करणे आवश्यक असणे, संबंधित स्टोन क्रशर चालकांकडून मागील ६-७ वर्षांत अवैधरित्या हजारो ब्रास गौण खनिजाचे उत्खनन झाले असून त्याद्वारे शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडवल्याचे समोर येत असणे, त्याचप्रमाणे तालुक्यातील पुरनाड फाट्यावरील गट नं १९६ मध्ये हजारो ब्रास अवैध उत्खनन करून शेत मालकाने शासनाच्या कोट्यवधी रुपयांची गौण खनिज रॉयल्टी चोरी करणे, या प्रकरणातील दोषींवर दंडात्मक वसुलीसह तात्काळ कठोर फौजदारी गुन्हे दाखल करणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

**(४)** **श्री जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शिक्षण व सेवा योजन विभागाच्या दिनांक १० जानेवारी, १९९२ च्या शासन निर्णयानुसार मुलींची शाळेतील उपस्थिती वाढविण्याच्या हेतूने मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता देय ठरविला जाणे, उपस्थिती भत्ता अनुसूचित जाती, भटक्या जाती व विमुक्त जमातीतील दारिद्र्य रेषेखालील मुलींना नियमितपणे शाळेत उपस्थित राहण्यासाठी प्रत्येक मुलीमागे दरदिवशी १ रुपया या दराने मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता दिला जाणे, उपस्थिती भत्त्याचे माहे जानेवारी, १९९२ मध्ये

ठरविलेले दर ३४ वर्षानंतर सुद्धा तेच राहणे, मागील ३४ वर्षांमध्ये महागाईचे दर प्रचंड वाढले असताना व १ रुपयाला कोणतेच महत्त्व नसताना उपस्थिती भत्ता म्हणून ३४ वर्षांपूर्वी ठरवलेल्या दरामध्ये कोणताही बदल केला न जाणे, याबाबत विविध संघटनांच्या आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निवेदनानंतरही उपस्थिती भत्त्याच्या दरामध्ये कोणताही बदल केला न जाणे, दारिद्रय रेषेखालील मुलींना शाळेत नियमित उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहन देण्यास १ रुपयाचा दर निरूपयोगी ठरणे आणि त्यामुळे मुलींची शाळेमधील उपस्थिती कमी होणे, संभवत: पालकांनी मुलींना नियमितपणे शाळेत पाठविण्यास प्रवृत्त करण्यासाठी उत्तेजनार्थ अथवा प्रोत्साहनात्मक रक्कम वाढविण्याची आवश्यकता निर्माण होणे, वाढलेली महागाई आणि दारिद्रय रेषेखालील मुलींचे शाळेतील उपस्थितीचे घटलेले प्रमाण याचा विचार करून सन २०२६ -२७ पासून किमान उपस्थिती भत्त्याचे प्रत्येक मुलीमागे दर दिवशी रुपये १० करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.शिवाजीराव गर्जे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"केंद्र शासनाच्या संरक्षण विभागामार्फत देशभरात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात एकूण मान्यताप्राप्त ८ शाळा महाराष्ट्र राज्यामध्ये असणे, त्यामध्ये एस.के.इंटरनॅशनल सैनिक स्कूल, सांगली/भोसला मिलिटरी स्कूल, नागपूर/आदर्श पब्लिक स्कूल कुर्डूवाडी, सोलापूर/पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सैनिक स्कूल, लोणी, अहिल्यानगर / भोसला मिलिटरी स्कूल (मुली) नाशिक / योगेश्वरी शिक्षण संस्था, बीड / यशवंतराव भोसले आंतरराष्ट्रीय विद्यालय, सिंधुदुर्ग / डी.सी. छत्रपती संभाजीनगर शाळेचा समावेश असणे, या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अखिल भारतीय सैनिक शाळा परिक्षा (AISSEE-NTA) मार्फत प्रवेश मिळत असल्यामुळे विविध राज्यातील विद्यार्थी येथे शिक्षण घेत असणे, यामध्ये महाराष्ट्र राज्यातील बरेच विद्यार्थी हे आर्थिकदृष्टया दुर्बल व वंचित घटकातील असणे, हे विद्यार्थी गुणवत्ताधारक असून शैक्षणिक फी भरण्यास असमर्थ असणे, त्यामुळे महाराष्ट्रातील या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाल्यास विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेऊन पुढे (NDA, MPSC, UPSC) मध्ये जाऊन आपल्या देशाची सेवा करण्याची इच्छाशक्ती असणे, या परीक्षेत पास होऊन सैनिक स्कूलमध्ये प्रवेश घेणाऱ्या मुलांची संख्या अत्यंत अल्प असणे, राज्य शासनाकडून अनुसूचित जाती-जमाती, विभक्त जाती व भटक्या विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णय दिनांक १७ सप्टेंबर,२००३  नुसार प्रचलित दराने संपूर्ण खर्चाची रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येत असणे, त्याच धर्तीवर सर्वसाधारणपणे एकूण शैक्षणिक फी च्या ५० टक्के जास्तीत जास्त १ लाख एवढी रक्कम वरील नमूद सैनिक स्कूलच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.दादाराव केचे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वर्धा जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक व मजूर सहकारी संस्था संघ मर्यादित यांच्या संगनमताने भ्रष्टाचारी मार्गाने शासन निर्णय डावलून मर्जीतील मजूर सहकारी संस्थांना नियमबाह्य काम वाटप करुन मोठ्या प्रमाणात अनियमितता करून व आर्थिक पात्रता प्रमाणपत्र देत असणे, परिणामी अन्य मजूर सहकारी संस्थेत असंतोष निर्माण होत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात वारंवार DDR कडे प्राप्त होत असणे, मजूर सहकारी संस्था संघाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व व्यवस्थापक यांच्याकडे त्यांच्या नातेवाईकांच्या नावाने प्रत्येकी १०-१२ संस्था असणे, याच मजूर संस्थांना रुपये १० लक्ष खालील कामे नोटीस बोर्डावर न लावता जिल्हा उपनिबंधक व मजूर सहकारी संस्था संघ मर्यादित, वर्धा हे देत असणे, तसेच जिल्हा उपनिबंधक व मजूर सहकारी संस्था संघ मर्यादित, वर्धा कडून स्थानिक मजूर सहकारी संस्थांना कळविल्या जात नसणे, मजूर संघाचे अध्यक्ष/उपाध्यक्ष व व्यवस्थापक (प्रभारी) आपसांत कामे वाटून घेत असणे, वर्धा जिल्ह्यातील जिल्हा मजूर सहकारी संस्था संघ मर्यादित, वर्धाचे अध्यक्ष / उपाध्यक्ष व व्यवस्थापक (प्रभारी) यांच्याच मजूर सहकारी संस्थांना गेल्या अनेक वर्षांपासून सतत कामे देत असणे, वर्धा जिल्हा मजूर संस्थेच्या संघाच्या काम वाटपाची चौकशी करावी तसेच जिल्हा उपनिबंधक यांच्याकडून न्याय मिळत नसल्याने त्यांचीही चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, त्यामुळे वर्धा जिल्हा मजूर सहकारी संघ बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती करण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **वैद्यकीय शिक्षण मंत्री** : "महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षांचे लेखे अहवाल व सन २०२४ या वर्षाचा सव्वीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) परिवहन मंत्री** : " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचे हिशेब व हिशेब तपासणी अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**(सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६ व मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन (अनुक्रमांक १):-**

**(१) श्री.राजेश राठोड, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३६ वर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री निवेदन करतील :-**

डहाणू, जि.पालघर, येथील उपजिल्हा रुग्णालयात गर्भवतींची गैरसोय होत असल्याबाबत.

**(मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने (अनुक्रमांक २ ते ७):-**

**(२) श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४१ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

नरसाळा (जि.नागपूर) येथे गटारलाईनचे ७०० पाईप्स जळून खाक झाल्याबाबत.

**(३) ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४० वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील कनिष्ठ लेखा परिक्षक/रोखपाल पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्याबाबत.

**(४) श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४३ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

मुंबई महानगरपालिकेतील मोठ्या पायाभूत प्रकल्पांच्या निविदा प्रक्रियेत झालेली अनियमितता व गैरव्यवहारासंदर्भात.

(५) **श्री. अरुण लाड, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४४ वर जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री निवेदन करतील :-**

अलमट्टी धरणाच्या उंची वाढीबाबत शासनाने कठोर भूमिका घेणेबाबत.

(६) **श्री. धीरज लिंगाडे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४७ वर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यांकरिता बुलढाणा येथे "संत गजानन महाराज" या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याबाबत.

(७) **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४२ वर पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील २३ हजार जलक्षेत्रांचे संरक्षण लाल फितीत अडकल्याबाबत.

(८) **श्री.सत्यजित तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४८ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

राज्यातील घरांमध्ये अद्यापही शौचालय सुविधा नसणे, सार्वजनिक शौचालयांची दुरवस्था व 'एक ट्रिलियन डॉलर' अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टाशी सुसंगत स्वच्छता-पायाभूत सुविधांसाठी विशेष कार्यक्रमाबाबत.

(९) **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४५ वर वैद्यकीय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी अंतर्गत संस्थेतील कर्मचाऱ्यांचे अनेक महिन्यांपासून थकीत वेतन व त्यातून निर्माण झालेली गंभीर परिस्थिती.

(१०) **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४६ वर वैद्यकीय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेल्या प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि सहायक प्राध्यापक पदी सार्वजनिक आरोग्य विभागातील इच्छुक वैद्यकीय अधिकाऱ्यांना तातडीने थेट नियुक्ती देण्याबाबत.

(११) **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५१ वर मृद व जलसंधारण मंत्री निवेदन करतील :-**

शासनाच्या जलसंधारण विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी संवर्ग व जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) गट ब पदभरती करणेबाबत.

(१२) **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५० वर पणन मंत्री निवेदन करतील :-**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मनमानी कारभाराबाबत.

(१३) **श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५६ वर सांस्कृतिक कार्य मंत्री निवेदन करतील :-**

स्वराज्यातील गडकिल्ले, मावळयांच्या समाध्या, जन्मस्थळ, ऐतिहासिक ठिकाणे यांच्या संवर्धनसाठी गडकोट विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत.

(१४) **श्री. जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५५ वर सामाजिक न्याय मंत्री निवेदन करतील :-**

वेश्याव्यवसायातील महिलांना आणि त्यांच्या अनौरस अपत्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यातील अडचणीबाबत.

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री. अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय वाढत असणे, सदर बाब अनेक ठिकाणी प्रत्यक्ष पोलिस कारवाईतून समोर येणे, मानव तस्करी, गुन्हेगारी आणि कायदा-सुव्यवस्था यांच्याशी जोडलेला गंभीर विषय बनणे, महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये मसाज किंवा वेलनेस सेंटरच्या आडून देहव्यापार चालवल्याचे पोलिस तपासात आढळणे, पुण्यातील विमाननगर येथे स्पा वर छापा टाकताना वेश्याव्यवसायासाठी जबरदस्तीने ठेवलेल्या महिलेचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडणे, नवी मुंबई, पिंपरी-चिंचवड, ठाणे येथेही स्पा सेंटरमधून महिलांची सुटका व मालकांवर गुन्हे दाखल झाल्याच्या घटना वारंवार समोर येणे, यातून काही स्पा व्यवसाय फ्रंट म्हणून वापरले जात असल्याचे दिसणे, यामध्ये प्रामुख्याने बाहेरच्या राज्यातील महिलांना नोकरीच्या अमिषाने आणणे,

पासपोर्ट/मोबाईल काढून घेणे, ग्राहकांकडून मोठी रक्कम घेऊन महिलांना कमी हिस्सा देणे, जबरदस्ती किंवा कर्जाच्या नावाखाली काम करवून घेणे, हे प्रकार थेट मानव तस्करी अंतर्गत येणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील नंदुरबार शहरामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत असून, संघटित व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या घटकांकडून खुलेआम दहशत निर्माण करण्याचा प्रकार घडणे, ही अत्यंत चिंताजनक बाब असून, उपनगराध्यक्ष यांच्या विजयाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या मिरवणुकीवर काही समाजकंटकांकडून सुनियोजित स्वरूपात दगडफेक करण्यात येणे, हा प्रकार केवळ कायदा व सुव्यवस्थेचा भंग नसून लोकशाही मूल्यांवर आघात करणारा असल्याचे दिसून येणे, तसेच माजी आमदार यांच्या राहत्या निवासस्थानी दिनांक ०९ जानेवारी, २०२६ रोजी रात्री सुमारे ११.०० ते ११.३० दरम्यान अवैध व्यवसायात संलग्न असलेल्या घटकांकडून दगडफेक करण्यात येणे व त्यांच्या वाहनास जाळपोळ करून गंभीर स्वरूपाची तोडफोड करण्यात येणे, सदर घटनेमुळे शहरात भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होणे, याहूनही गंभीर बाब म्हणजे संबंधित माजी आमदार महोदय स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यास गेले असता, स्थानिक गुन्हे शाखेचे (LCB) पोलीस निरीक्षक यांच्याकडून अवैध व बेकायदेशीर आवाज उठविल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्याविरुद्धच खोटी फिर्याद नोंदविण्यात येऊन गुन्हा दाखल करणे, यामुळे पोलीस प्रशासनाची निष्पक्षता, पारदर्शकता व कार्यपद्धती यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, उक्त घटनांबाबत व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री राजहंस सिंह, सुनिल शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहरातील मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रे ही सर्वसामान्य नागरिकांना मोफत किंवा अत्यंत सवलतीच्या दरात दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी उपलब्ध असणे, मुंबईतील महानगरपालिका रुग्णालयांच्या इमारती जीर्ण अवस्थेत असून स्वच्छतेचा अभाव, आवश्यक वैद्यकीय उपकरणांची कमतरता, डॉक्टर, परिचारिका आणि इतर आरोग्य कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे, रुग्णांना वेळेवर आणि योग्य उपचार मिळण्यात येणाऱ्या अडचणी, अनेक रुग्णालयांमध्ये MRI, CT Scan, सोनोग्राफी, रक्त तपासणी यांसारख्या अत्यावश्यक वैद्यकीय चाचण्या उपलब्ध

नसल्याने रुग्णांना खाजगी प्रयोगशाळांकडे पाठविण्यात येत असणे, तसेच आवश्यक औषधांचा तुटवडा असल्यामुळे रुग्णांना बाहेरील औषध दुकानदारांकडून महागडी औषधे खरेदी करावी लागत असणे, त्यामुळे गरीब व सर्वसामान्य नागरिकांवर वाढत असलेला आर्थिक ताण, मुंबई उपनगरातील अनेक महानगरपालिका रुग्णालयांमध्ये गंभीर आजारांवर उपचारासाठी पुरेशी यंत्रणा नसल्याने होणारी गैरसोय, खाटांची संख्या अपुरी असल्यामुळे काही रुग्णांना जमिनीवर झोपण्याची वेळ येणे, कित्येक रुग्णालयात ICU बंद असणे, रुग्णालयातील लिफ्ट वारंवार बंद पडणे, स्वच्छतागृहांची अपुरी व्यवस्था, रुग्णवाहिकांची कमतरता आणि रुग्णांच्या नातेवाईकांसाठी मूलभूत सोयी नसल्याच्या तक्रारीही मोठ्या प्रमाणावर निदर्शनास येणे, सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी आणि दर्जेदार आरोग्य सेवा प्रभावीपणे उपलब्ध होऊ शकेल यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना."

(४) **सर्वश्री सुधाकर अडबाले, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"नागपूर महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ५९ महिन्यांची सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळाली नसणे, थकबाकी मिळाली नसल्याने शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले असणे, सदर कर्मचाऱ्यांत वाढता रोष बघता शालार्थ वेतन प्रणालीमधून वेतन घेणाऱ्या शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ५९ महिन्यांची सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याबाबत शासनाने करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(५) **ॲड. अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अधिकार अभिलेख म्हणजेच गाव नमुना नंबर ७/१२ हा सर्वसामान्य शेतकरी नागरिक यांच्या शेती व बिगरशेती मिळकतींशी संबंधित अत्यंत महत्वाचे कागदपत्र असून सदर गाव नमुना नंबर ७/१२ हा अचूक व अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी महसूली अधिकारी यांची असणे, असे असतानाही पुणे जिल्हयात महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यांतर्गत कलम १५५ चा गैरवापर काही महसूली अधिकारी यांनी करुन अनेक बेकायदेशीर आदेश पारित केलेले असल्याबाबतची बाब जुलै, -ऑगस्ट,२०२५ च्या दरम्यान निदर्शनास आलेली असणे, सदर बेकायदेशीर आदेश पारित केल्याबाबत विभागीय आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांची चौकशी समिती नेमलेली असणे, विभागीय आयुक्त यांच्या अहवालानुसार अनेक गंभीर प्रकार, बेकायदेशीरपणा व अनियमितता निदर्शनास

आलेल्या असूनही शासनाने कोणतीही कारवाई अद्याप केलेली नसणे, या गंभीर प्रकरणात शासनाचे झालेले दुर्लक्ष व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

(६) **सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ. परिणय फुके, सर्वश्री सदाशिव खोत, संजय केणेकर, सुनिल शिंदे, अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्ह्यात जलजीवन मिशन योजनेअंतर्गत हजारो कोटी रुपयांचा खर्च करूनही जिल्ह्यातील सुमारे १२५३ गावे व वाड्यांचा संभाव्य पाणीटंचाई कृती आराखड्यात समावेश करण्याची नामुष्की जिल्हा प्रशासनावर आली असणे, रायगड जिल्ह्यात पुरेसा पाऊस पडूनही योग्य नियोजनाअभावी रायगड जिल्ह्याला दरवर्षी पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असणे, जिल्ह्यातील नद्यांवर पुरेशी धरणे नसल्याने पावसाचे पाणी थेट समुद्राला जाऊन मिळत असणे, जलजीवन मिशनअंतर्गत जिल्ह्यात १४२२ योजनांची कामे हाती घेण्यात आली असून ही कामे माहे डिसेंबर, २०२३ अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असणे, विहित मुदतीत कामे पूर्ण न झाल्याने अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी ठेकेदारांना दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली असणे, मुदतवाढ देऊन देखील अद्याप ही कामे पूर्ण झालेली नसणे, परिणामी, या गावांना आगामी काळातही टंचाईचा सामना करावा लागणार असणे, दोषपूर्ण नियोजन करणारे अधिकारी आणि मुदतीत कामे पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **सर्वश्री विक्रम काळे, अमोल मिटकरी, सतिश चव्हाण, शिवाजीराव गर्जे, इद्रिस नायकवडी, पंकज भुजबळ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"आरटीईनुसार खासगी शाळांमधील इयत्ता पहिलीतील २५ टक्के जागा आर्थिकदृष्टया दुर्बल व सामाजिकदृष्टया वंचित घटकांसाठी राखीव असणे, या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासनाच्यावतीने मोफत प्रवेश मिळणे, त्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणे, या प्रक्रियेत संगणकीय लॉटरीद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क सरकारकडून शाळांना प्रतिपूर्ती स्वरुपात दिले जात असणे, तथापि, ही शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम सन २०१४ पासून एकरकमी शाळांना न दिल्यामुळे सुमारे दोन हजार कोटींपर्यंत रक्कम पोहोचली असल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, त्यामुळे थकबाकीची संपूर्ण रक्कम मिळाल्याशिवाय आरटीई प्रवेश प्रक्रियेत शाळांची नोंदणी होणार नाही तसेच नव्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही, असा इशारा महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज

असोसिएशनचे (मेस्टा) संस्थापक यांनी दिलेला असणे, आरटीई प्रवेश प्रक्रियेतील शाळांना थकबाकीची रक्कम मिळायला हवी यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरु असणे, येत्या काही दिवसात त्याबाबत निर्णय होईल असे संचालक, प्राथमिक शिक्षण विभाग यांचेकडून सांगण्यात आलेले असणे, परंतु अद्याप याप्रकरणी कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, परिणामी संचालकाकडून सांगितल्यानुसार शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **सर्वश्री जयंत आसगावकर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कौशल्य विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात ६०० हून अधिक अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण (ITI) संस्था असणे, त्यामध्ये सर्वसाधारण ९ हजारांहून अधिक विनाअनुदानित शिक्षक कार्यरत असणे, या शिक्षकांकडून सर्वसाधारणपणे ५० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना विविध ट्रेडचे प्रशिक्षण देऊन त्यांना कुशल बनविणे, मात्र गेल्या अनेक वर्षापासून हा शिक्षक वर्ग संस्था पगारावर राबत असणे, त्यांना संस्थेकडून जेमतेमच वेतन मिळणे, औद्योगिक प्रशिक्षण विकास महामंडळाकडून या शिक्षकांच्या न्याय मागणीसाठी शासन स्तरावर लढा सुरु असणे, दिनांक २२ ऑगस्ट, १९९५ साली नेमलेल्या जाधव समितीकडून ज्या खाजगी आयटीआयमध्ये चार व्यवसाय असतील, अशा संस्थांना अनुदान देण्याबाबतचा अहवाल शासनाकडे सादर करणे, त्यानंतर दिनांक २६ जून, १९९८ रोजी जाधव समितीचा अहवाल लागू करण्याचे आश्वासन देण्यात येणे, मात्र अद्यापही शासनाकडून कार्यवाही झालेली नसणे, या प्रश्नी महामंडळाकडून दिनांक २६ जुलै, १९९७ साली छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठात याचिका दाखल करणे, सध्या ITI मध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता शासनाकडून ८० टक्के फी परतावा योजना सुरू असणे, त्याकरिता सर्वसाधारण ३०० कोटींपेक्षा जास्त निधी हा राखीव ठेवलेला असणे, हा निधी या विनाअनुदानित शिक्षकांकरीता डीबीटी पोर्टलद्वारे वर्ग करावा, अशी मागणी महामंडळाकडून होत असणे, त्यांच्या मागणीचा विचार करता याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन राज्यातील या ९ हजार शिक्षकांचा प्रश्न मार्गी लावण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सहा म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा—**

(१) **सर्वश्री अभिजित वंजारी**, सुधाकर अडबाले, अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"राज्यातील वित्त विभागातील लेखा व कोषागार विभागातील संबंधित भरती प्रक्रियेमागे व विशेष करून कनिष्ठ लेखापाल पदाकरिता अर्हता ठरविताना कुठल्याही शाखेचा पदवीधर असा उल्लेख केल्यामुळे वाणिज्य शाखेच्या विद्यार्थांमध्ये अन्यायाची भावना निर्माण झाली असणे, वित्त विभागातील संबंधित कनिष्ठ लेखापाल, कनिष्ठ लेखा परीक्षक अथवा त्यांच्याशी साध्यर्म असलेल्या पदांचे कार्य अकाऊंटिंग, ऑडीटींग, फायनान्स, बजेटींग, रिकन्सिलिएशन यांच्याशी संबंधित असल्यामुळे वाणिज्य शाखेचे विद्यार्थी या पदाकरिता जास्त उपयुक्त ठरतात, तेव्हा राज्यातील वित्त विभागाच्या संबंधित सर्व शासकीय व निमशासकीय पदभरतीमध्ये कुठल्याही शाखेचा पदवीधर अशी अर्हता ठेवण्यापेक्षा वाणिज्य शाखेचा पदवीधर अशी अर्हता निश्चित करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. सदाशिव खोत,** श्रीमती उमा खापरे, श्री. अमित गोरखे, वि.प.स. **यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"कोकणात सध्या वानरांचा प्रचंड उपद्रव वाढला असून शेतकरी मोठ्या संकटात सापडला असणे, आंबा, केळी, नारळ, चिकू, पेरू, पपई, शेवगा तसेच विविध भाजीपाला पिकांचे दरवर्षी लाखो रुपयांचे नुकसान होत असणे, बागांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रंदिवस पहारा द्यावा लागणे, तरीही माकडे घरात घुसून नासधूस करणे, पत्रे-नळे फोडतात आणि अनेकदा लोकांच्या अंगावरही धावून येणे, या सततच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान, शारीरिक त्रास आणि मानसिक ताण सहन करावा लागत असणे, नुकसान भरपाईची प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची असल्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना न्याय मिळत नसणे, हिमाचल प्रदेशात ज्या प्रकारे वानर-माकडांना उपद्रवी प्राणी घोषित करून उपाययोजना करण्यात आल्या, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही तातडीने ठोस निर्णय घेण्याची गरज असणे, हिमाचल प्रदेशमध्ये माकडांमुळे पिकांचे मोठे नुकसान होत असल्याने राज्य सरकारने केंद्र सरकारकडे प्रस्ताव देऊन काही जिल्ह्यांमध्ये रीसस माकडांना “वर्मिन” (Vermin) म्हणून घोषित करण्याची परवानगी घेतली, ज्यामुळे त्या भागांमध्ये नियंत्रित पद्धतीने त्यांचे नियंत्रण करणे शक्य असणे, याबाबत कोकणातील शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : शासकीय विधेयके –**

**(क) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ – भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

(२) सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ — महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**(ख) विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ — महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विधेयक विचारात घेणे :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०२६"

**(घ) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

(१) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

(२) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ — महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(३)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ – महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(४)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ – महाराष्ट्र निरसन विधेयक, २०२६

---

**(५)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड. अनिल परब, श्री सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

आठ : **(मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) –**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री. सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती भावना गवळी, श्री. पंकज भुजबळ, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, संजय खोडके, डॉ. परिणय फुके, सर्वश्री किशोर दराडे, अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, चंद्रकांत रघुवंशी,

शिवाजीराव गर्जे, सदाशिव खोत, इद्रिस नायकवडी, दादाराव केचे, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, अमरिशभाई पटेल, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, संजय केणेकर, राजहंस सिंह, संदीप जोशी, ज्ञानेश्वर म्हात्रे, धर्मगुरू बाबूसिंग महाराज, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात पर्यटन क्षेत्रात खासगी गुंतवणूकीसाठी उत्साहवर्धक आणि अनुकुल वातावरण निर्माण करण्याकरिता 'पर्यटन धोरण-२०२४' जाहिर करण्यात आले असणे, मराठा मिलिटरी लँडस्केप्स संकल्पनेंतर्गत राज्यातील १२ ऐतिहासिक गडकिल्ल्यांचा समावेश युनोस्कोच्या जागतिक वारसा नामांकन यादीत झाल्यामुळे त्यायोगे राज्यातील पर्यटनात वाढ होणार असणे, नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची ऐतिहासिक दस्तावेज असलेली तलवार राज्य शासनाने जवळपास ४७.१५ लाख रुपयांमध्ये लंडनमधून खरेदी करुन राज्यात आणली असणे, १०० वर्षाहून अधिक मोठी परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला 'महाराष्ट्र राज्य महोत्सव' म्हणून घोषित करण्यात आले असणे, पर्यटन व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या राज्यातील महिलांकरिता 'आई पर्यटन कर्ज योजना' सुरु करण्यात आली असणे, महिला पर्यटकांसाठी एमटीडीसीच्या रिसॉर्टमध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणे, राज्यातील तीर्थक्षेत्र विकास आराखडयास ३६६१ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असणे, प्रधानमंत्री कुसुम घटक 'ब' योजनेंतर्गत मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेखाली माहे डिसेंबर, २०२५ या एका महिन्यांमध्ये ४५,९११ सौर कृषी पंप बसवून महाराष्ट्राची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली असणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दारिद्रयरेषेखालील वीज ग्राहकांसाठी 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रुफ टॉप सोलर योजना' सुरु करण्यात आली असणे, 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना' कार्यान्वित करण्यात आली असणे, पर्यटनदृष्टया राज्य समृध्द होण्यासाठी व त्यातून आर्थिक स्त्रोत निर्माण होण्यासाठी तसेच ऊर्जेच्या क्षेत्रात राज्य स्वयंपूर्ण होऊन शेतकरी चिंतामुक्त होण्यासाठी करण्यात येत असलेली कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**नऊ : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

**(१) सर्वश्री सदाशिव खोत, श्री. अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग अंतर्गत गेल्या दहा महिन्यांत नागपूर जिल्ह्यातील ४१७ शेतकरी व उद्योगांनी अर्ज केलेले असणे, त्यातील ४५ टक्के अर्ज बँकांकडे प्रलंबित असणे, त्यामुळे मेक इन इंडियाला चालना देण्याच्या केंद्र शासनाच्या महत्त्वकांक्षी योजनेचे उद्दिष्ट पूर्ण न होणे, उत्पादनाचे ब्रँडिंग, विपणन, साठवणूक, पॅकिंग सामाईक प्रक्रिया सुविधा प्रयोगशाळा आदीसह सूक्ष्म उद्योगांना बळकटी देण्याचा मुख्य उद्देश असणे, परंतु योजनेला चांगला प्रतिसाद असताना मात्र कर्ज मंजुरी प्रलंबित असल्याने अनेक लाभार्थी अडचणीत सापडलेले असणे,

प्रलंबित अर्ज तात्काळ निकाली काढण्यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, जिल्हा कृषी अधिक्षक यांच्या समन्वयाने प्रलंबित अर्जांबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

**(२) सर्वश्री योगेश टिळेकर, प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यामध्ये शासनाने ओबीसी महामंडळाअंतर्गत उपकंपन्यांची स्थापना केलेली असणे यापैकी गुरव आणि वीरशैव लिंगायत या समाजासाठी सन २०२३ मध्ये आर्थिक विकास महामंडळांची स्थापना करणे त्याचप्रमाणे नाभिक, सोनार, तेली, बारी, लोणारी, वाणी, शिंपी, सुतार, लेवा, पाटीदार, गुजर आणि आगरी या समाजासाठी ११ आर्थिक विकास महामंडळाची स्थापना सन २०२५ मध्ये केलेली असणे. या सर्व आर्थिक विकास महामंडळासाठी प्रत्येकी ५० कोटी रूपयांचे भाग भांडवलास वन विभागाची मंजुरी दिलेली असणे, परंतु सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये या सर्व आर्थिक महामंडळाची माहिती घेतली असता काही महामंडळास ४ कोटी रुपयांचा व काही महामंडळास केवळ २ कोटी रुपयांचा निधी भागभांडवल म्हणून वितरित करणे, म्हणजेच सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात नवीन उप कंपनी करिता केवळ २४ कोटी रुपये भाग भांडवल म्हणून वितरित केलेला असणे, इतर मागासवर्गीय समाजाच्या ज्या उपकंपन्या स्थापन केल्या होत्या त्याचा उद्देश सर्व समाजातील घटकांपर्यंत शासनाचा लाभ पोहोचविणे हा असताना या आर्थिक महामंडळामध्ये ७९५ लाभार्थीनी नावे नोंदविलेली असताना केवळ १७१ लाभार्थ्यांनाच त्याचा लाभ घेता आला असणे तसेच निधी नसल्यामुळे हजारो समाज बांधवांना लाभापासून वंचित राहावे लागणे यासाठी या सर्व आर्थिक विकास महामंडळांना भरघोस निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १८ मार्च, २०२६.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.